N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** औंढा नागनाथ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0690 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 20:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 11/12/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/12/2024

**Time From (वेळेपासून):** 14:03 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/12/2024 **Time (वेळ):** 20:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 20:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** घरकुल विभाग, पंचायत समिती कार्यालय औंढा ना ,औंढा ना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): संतोष गंगाधर जवादे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ब्राम्हणवाडा,औंढा ना,औंढा नागनाथ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ब्राम्हणवाडा,औंढा ना,औंढा नागनाथ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय): शेतकरी

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9356565939

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय दशरथ पहारे | | | 1. आनंद नगर आकोला बायपास, हिंगोली ,हिंगोली ,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. Case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक:- 19.12.2024

फिर्याद

मी, संतोष गंगाधर जवादे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती, रा. ब्राम्हणवाडा,ता. औंढा ना.,जि. हिंगोली मो. 9356565939

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर राहून फिर्याद देतो की, मी दिनांक 11.12.2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, मी मौजे ब्राम्हणवाडा ता. औंढा ना. जि. हिंगोली येथील राहणारा असून शेती व्यवसाय करतो. माझे व माझे वडील गंगाधर रामजी जवादे असे दोघांचे नावाने ब्राम्हणवाडा गावात जागा आहे. त्या जागेवर पंचायत समिती औंढा ना. कडून शबरी घरकुल आवास योजने अंतर्गत आम्हा दोघां बाप-लेकांना घरकुल मंजुर झाले आहेत त्या घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी मंजूर झालेली प्रत्येकी 1,20,000/-रु. प्रमाणे दोघांचे एकुण 2,40,000/- रु. रक्कम मिळणे बाकी आहे.

दि.10.12.2024 रोजी आमचे घरकूलाची रक्कम आमचे बँक खात्यावर टाकण्यासाठी मी पंचायत समिती औंढा ना. येथील पहारे साहेब यांना जावून भेटलो असता त्यांनी माझे व माझे वडील गंगाधर जवादे यांचे घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी पहीला हप्ता प्रत्येकी 15,000/-रु. प्रमाणे आमचे दोघांचे बँक खात्यावर 30,000 /-रु. जमा करण्यासाठी बोललो असता त्यांनी मला आमचे घरकुलांचे हप्ते बँक खात्यावर जमा करण्यासाठी 2,000 /-रु. लागतील असे सांगून पैशाची मागणी केली आहे.

पंचायत समिती औंढा ना येथील पहारे साहेब हे मला मागत असलेले पैसे 2,000/-रु. लाच असल्याची माझी खात्री झाली असून त्यांना लाच देण्याची माझी अजीबात ईच्छा नाही परंतु पहारे साहेब यांना मी पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाहीत म्हणून मी नाइलाजास्तव त्यांना होकार दिला आहे. त्यांचेशी माझी कोणतीही दुश्मनी किंवा उसने देण्या घेण्याचा व्यवहार नाही. पहारे साहेब यांना देण्यासाठी 2,000/- रु. मी माझे बचतीतुन सोबत आणले आहेत, तरी पहारे साहेब पंचायत समिती औंढा ना यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करावी.

त्यानंतर पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री गजानन घनश्याम आसोले, व्यवसाय नौकरी, शिपाई व श्री शिवाजी दगडीराम वल्लमवाड, व्यवसाय नौकरी, सहा. भांडारपाल, दोन्ही सार्वजनीक बांधकाम विभाग कार्यालय हिंगोली असे असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 11.12.2024 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 आसोले यांचेसह श्री अजय पहारे, ऑपरेटर यांची भेट घेण्या करीता औढा ना येथील पंचायत समिती येथे गेलो असता श्री अजय पहारे, ऑपरेटर यांची पंचायत समिती औढा ना येथे भेट झाली तेव्हा माझे व माझे वडीलाचे घरकुलाचे पैसे आमचे बॅक खात्यावर टाकण्यासंबंधाने बोलणी केली असता अजय दशरथ पहारे, ऑपरेटर यांनी "एक-एक प्रत्येकाचे देवुन टाका दोन हायतं तुमचे दोन देवुन टाका" तेव्हा मी त्यांना " दोन हजार." म्हणालो असता लोकसेवक पहारे यांनी मला "हो" असे म्हणुन 2,000/- लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दिली होती.

त्यावरून दिनांक 12.12.2024 रोजी पो.नि. श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी परभणी रोडवरील नॅशनल धाब्याचे पाठीमागे मोकळ्या जागेत शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करुन दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 2,000/- रू. (ज्यात 100/- रू. चे 20 नोटा) चे नंबर व वर्णन एका

कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी अँन्थ्राँसीन पावडर व अॅल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक पोह/अकबर लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँसीन पावडर लावली व अजय पहारे, आँपरेटर यांनी लाच स्विकारल्या नंतर गळ्यातील केशरी रंगाचा मोठा रूमाल काढून हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी मला पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली.

त्यानंतर दिनांक 12.12.2024 चे दुपारी 12.45 वा. दरम्यान मी पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे अजय पहारे, यांना भेटण्यासाठी पंचायत समिती औढा ना. कडे रवाना झालो. तेव्हा माझी व अजय पहारे यांची पंचायत समिती येथे भेट झाली तेव्हा पहारे साहेबाच्या खोलीत दरवाज्याचे समोर आडव्या खुर्च्या लावल्या होत्या व त्यांचे कार्यालयात त्यांचे मोठे साहेब व इतर बरेच कर्मचारी असल्याने मी त्यांना देण्यासाठी सोबत नेलेले पैसे त्यांना देता आले नाही त्यामुळे मी काही दिवसांनी परत पहारे यांची भेट घेतो तेव्हा आपण पुढील कार्यवाही करावी असे सांगीतले होते व सापळा कारवाई तात्पुरती थांबविली होती.

त्यानंतर दिनांक 19.12.2024 चे दुपारी 14.32 वा. दरम्यान मी पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे अजय पहारे, यांना भेटण्यासाठी पंचायत समिती औढा ना. कडे रवाना झालो. तेव्हा माझी व अजय पहारे यांची पंचायत समिती औढा ना येथे भेट झाली तेव्हा मी अजय पहारे यांना म्हणालो कि, ते तुम्ही म्हणले होतेत तेव्हा अजय पहारे हे मला म्हणाले कि, ''करून टाका मग'' तेव्हा त्यांनी मला नांव विचारले व मी सांगीतले कि, संतोश जवादे आणि गंगाधर जवादे असे म्हणालो तेव्हा ते मला म्हणाले कि, काय होत याचं आता तेव्हा मी त्यांना म्हणालो कि, '' ते हप्ता पडलानं '' तेव्हा ते मला म्हणाले हं... व तेव्हा मी त्यांना म्हणालो कि, '' ते म्हणलं होतनं चिल्लर ति घेवुन आलो मी'' तेव्हा अजय पहारे यांनी '' हं ...देवुन टाकान मग'' असे म्हणुन लाच स्विकारण्याची सहमती दर्षविली तेव्हा मी माझे पॅन्टचे उजव्या खिषात ठेवलेली लाचेची रक्कम 2,000/-रू. अजय पहारे यांचे समोर धरली व त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे अंगातील पॅटचे उजवे बाजुच्या खिषात ठेवली. तेव्हा मी सापळा पथकास ठरल्या प्रमाणे लाच स्विकाल्याचा ईषारा केला. तेव्हा सापळा पथकाने अजय पहारे यांना दुपारी 03.28 वा. घरकुल विभाग, पंचायत समीती कार्यालय औंढा ना. येथे ताब्यात घेवुन त्यांचे अंगातील पॅटचे उजव्या बाजुच्या खिषात ठेवलेली लाचेची रक्कम 2,000/-रू. त्याचेकडून पंचासमक्ष जप्त केली. तसेच पडताळाणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व आरोपी अजय पहारे, रा. हिंगोली यांचेषी प्रत्यक्ष भेटी दरम्यान व फोनवर झालेले संभाशण हे व्हाईस रेकाॅर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकाँर्ड करण्यात आले आहे.

तरी अजय दशरथ पहारे, आँपरेटर यांनी माझे व माझे वडील गंगाधर जवादे यांचे घरकूलाचे बांधकाम करण्यासाठी पहीला हप्ता प्रत्येकी 15,000/-रू. प्रमाणे आमचे दोघांचे बॅक खात्यात जमा करण्यासाठी 2,000/-रू. लाचेची मागणी करून 2,000/- रु लाचेची रक्कम घरकुल विभाग पंचायत समीती कार्यालय औंढा ना. येथे आज रोजी स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय, हिंगोली येथे आज दिनांक 19.12.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांना तोंडी सांगितली असून ती त्यांनी संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

(विनायक जाधव) संतोष गंगाधर जवादे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली . रा. ब्राम्हणवाडा, ता.औढा ना.जि.हिंगोली

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)
VINAYAK DEVIDASRAO JADHAV
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): 15101000402VDJ
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Gawade

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): GANPAT SATVAJI RA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API